1) लोकमत पू. पान क्र. 2

दि. 10/02/2023

# तत्काळ मदत हवीय? डायल करा '११२'!

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय हे 'डायल ११२'वर सर्वात कमी वेळेत प्रतिसाद देणारे राज्यातले पहिल्या क्रमांकाचे आयुक्तालय आहे. या आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या १६ पोलिस ठाणी कार्यरत असून, चार पोलिस ठाणी प्रस्तावित आहेत. आयुक्तालयाच्या हद्दीत दाट शहरी भाग येतो तसाच अतिशय लांबचा व दुर्गम असा ग्रामीण भागसुद्धा येतो.

त्यामुळे ११२ डायलवर मदतीसाठी आलेला कॉल शहरी भागातील असेल तर पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास फारसा वेळ लागत नाही. परंतु, ग्रामीण वा दुर्गम भाग असेल तर मात्र प्रतिसादाला जास्त वेळ लागतो. जेणेकरून ग्रामीण भागातील प्रतिसादाचा वेळ कसा कमी करता येईल, याकडे पोलिसांनी अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

११२ वर कॉल केल्यानंतर पोलिस लवकर पोहोचणे हे जसे महत्त्वाचे आहे तसेच घटनास्थळी योग्य व प्रामाणिक मदत मिळणे गरजेचे आहे.

त्यामुळे मदतीसाठी आलेल्या कॉलच्या ठिकाणी लवकर पोहोचलो, अशी आकडेवारी दाखवून पाठ थोपटून घेणे चालणार नाही.

प्रत्यक्षात खऱ्या अर्थाने मदत झाली का? तक्रार बीट मार्शलकडून लीक झाली? याचा आढावा आणि आकडेवारीसुद्धा पोलिसांनी जाहीर केली पाहिजे. नव्हे नागरिकांनीही त्यांचे अनुभव न घाबरता वरिष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले पाहिजेत.




## काय आहे डायल ११२? लोकमत इन्फोग्राफिक्स

'डायल ११२' हा तत्काळ मदतीसाठी दिलेला सहाय्यता क्रमांक आहे. त्याचे मुख्य कॉल सेंटर हे नवी मुंबईमध्ये आहे. ११२ वर कॉल केल्यानंतर तेथून संबंधित पोलिस आयुक्तालय वा पोलिस अधीक्षक यांच्या कंट्रोल रुमला माहिती दिली जाते. कंट्रोल रुमवरून मग संबंधित पोलिस ठाणे हद्दीतील बीट मार्शलना कळविले जाते.

### वर्षभरात ३४ हजार ९८७ कॉल

२०२२ या वर्षात मीरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालयात ११२ वरून ३४ हजार ९८७ कॉल आले. जानेवारी २०२३ या महिन्यात ३,९१८ कॉल आले आहेत.

### साडेसात मिनिटांच्या आत मदत

शहरी व ग्रामीण भागाचा विचार करता २०२२ साली सरासरी प्रतिसाद देण्याची वेळ ७ मिनिटे ३४ सेकंद इतकी राहिली आहे. जानेवारी २०२३ ह्या महिन्यात प्रतिसादाची सरासरी वेळ ३ मिनिटे ४९ सेकंद इतकी राखण्यात पोलिसांना यश आले आहे.

### १०० टक्के कॉल पूर्ण

पोलिसांनी ११२ वर आलेल्या सर्वच्या सर्व म्हणजे १०० टक्के कॉलना प्रतिसाद दिल्याचे पोलिस सांगतात.



### सर्वाधिक तक्रारी कशाच्या?

सर्वाधिक तक्रारी भांडणे, मारामाऱ्या, गर्दुल्ले वा व्यसनी यांचा जाच, ध्वनी प्रदूषण याच्या आहेत.

इमर्जन्सी रिस्पॉन्स व्हेइकल मिळाली असून, आणखी वाहनांची मागणी केली आहे. मदतीची वेळ आणखी कमी करण्यासाठी प्रयत्न व उपाययोजना करत आहोत. कंट्रोल रुममधून कोणता बीट मार्शल मदतीच्या ठिकाणापासून जवळ आहे, याची खात्री केली जाते. प्रतिसाद व झालेल्या मदतीचा नियमित आढावा घेतला जातो.

- श्रीकांत पाठक, अतिरिक्त पोलिस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालय

2) लोकमत पू. पान क्र. 3

# लग्नास नकार देणाऱ्या प्रेयसीवर अत्याचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** दीड वर्षापासून प्रेमसंबंध असताना तरुणाचा धर्म वेगळा म्हणून लग्नास प्रेयसीने नकार दिल्याचा राग येऊन प्रियकराने खासगी छायाचित्रे व व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत मारहाण, लैंगिक अत्याचार केला तसेच थुंकी चाटायला लावली, अशी तक्रार तरुणीने दिल्यावर काशीमीरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली. काशीमीरा पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील आरोपी मीरा रोडचा इम्तियाज चौधरी याला पोलिसांनी अटक केली. इम्तियाज व ठाण्यात राहणाऱ्या तरुणीचे गेल्या दीड वर्षांपासून प्रेमसंबंध होते.

CamScanner
Scanned with CamScanner

३) लोकसत्ता पू. पान क्र.। दि. 10/02/2023

# वसई, विरारमध्ये बेसुमार रिक्षा

## शहरातील अधिकृत रिक्षांच्या संख्येत सहा हजारांनी वाढ

कल्पेश भोईर, लोकसत्ता

**वसई:** वसई, विरार शहरात मोठ्या प्रमाणात रिक्षांची संख्या वाढत आहे. एकीकडे हजारो अनधिकृत रिक्षा रस्त्यावर धावत असताना परवाने खुले झाल्यानंतर अधिकृत रिक्षांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. पावणेतीन वर्षात उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून सहा हजार १५ इतक्या परवान्यांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे शहरात रिक्षांची संख्या उदंड झाली आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने खासगी प्रवासी वाहतूक करण्यासाठी राज्य परिवहन विभागाकडून रिक्षांना मोटार वाहन कायद्यानुसार परवाने दिले जातात. २०१७ पासून रिक्षा परवाने खुले करण्यात आले आहेत. मागील तीन ते चार वर्षांत शहरातील रिक्षांची संख्या ही बेसुमार वाढली आहे. एप्रिल २०२० ते जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये परिवहन विभागाकडून जवळपास ६ हजार १५ इतक्या परवान्यांचे वितरण करण्यात आले आहेत. त्यामुळे दिवसेंदिवस शहरात रिक्षांची संख्या वेगाने वाढत आहे. सुरुवातीला केवळ ८ ते १० हजार असलेल्या रिक्षांची आकडेवारी सुमारे ३८ हजारांच्या घरात गेली आहे.

दरम्यान उपप्रादेशिक परिवहन विभागात रिक्षांचे परवाने काढण्यासाठी अर्ज येतात. त्यांची रीतसर पडताळणी करून परवाने दिले जात आहेत. तीन वर्षांत सहा हजारापेक्षा अधिक परवाने वितरण झाले आहे, असे वसई विभागाचे सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रवीण बागड यांनी सांगितले आहे.



### सर्वाधिक रिक्षाचालक परराज्यातील

राज्यात रिक्षासाठी परवाने खुले केले आणि नियम शिथिल केल्याने मोठ्या प्रमाणावर रिक्षाचालक शहरात दाखल होऊ लागले आहे. उत्तर प्रदेश, बिहार या राज्यातील रिक्षाचालकांची संख्या मोठी आहे. उत्तरेकडील राज्यातील बेरोजगार मोठ्या संख्येने वसई विरार शहरात रिक्षाचालक म्हणून कार्यरत आहेत. यापैकी अनेकांची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. एजंटच्या माध्यमातून बनावट कागदपत्रे सादर करून दाखले मिळवून रिक्षा परवाना काढला जात आहे.

### वाहतूक कोंडी

शहरात हजारो बेकायदेशीर रिक्षा धावत आहेत. अरुंद रस्ते, त्यावरील अतिक्रमण आणि अनधिकृत रिक्षाचालक यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. वाढत्या रिक्षांच्या संख्येचा परिणाम हा शहरातील रस्त्यावर दिसू लागला आहे. त्यातच काही बेशिस्त रिक्षाचालक हे अस्ताव्यस्त पध्दतीने रिक्षा उभ्या करतात. तर काहीवेळा प्रवासी घेण्याच्या नादात मध्येच रिक्षा थांबविल्या जातात. यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते. सातत्याने निर्माण होणारी वाहतूक कोंडी, हॉर्नचा त्रास यामुळे वाढती रिक्षांची संख्या ही शहराची डोकेदुखी ठरु लागली आहे. वसई, नायगाव, नालासोपारा, विरार अशा ठिकाणी स्थानकासह इतर परिसरात मोठ्या प्रमाणात रिक्षांची गर्दी होत असल्याचे चित्र दिसून येते.

### जागोजागी रिक्षा थांबे

रिक्षांची संख्या वाढली असली तरी अधिकृत रिक्षाथांबे नाहीत. त्यामुळे रिक्षाचालक मिळेल त्या ठिकाणी रिक्षा उभ्या करून अनधिकृतपणे रिक्षा थांबे केले जाऊ लागले आहेत. त्यामुळे रिक्षा थांब्याचा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे.

### थांब्यांना विरोध

वसई-विरार महापालिकेकडून १४५ ठिकाणी रिक्षा थांबे तयार करण्याचे काम सुरु आहे. मात्र काही ठिकाणी थांबे तयार करण्यासाठी विरोध असल्याने अडचणी निर्माण होत आहेत असे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.

४) म.टा. पू. पान क्र.।

**मटा अँकर** वाहतूककोंडी सोडविण्यासाठी नागरिकांच्या सूचना

# एकदिशा मार्ग आणि फेरीवाला धोरण राबवा

म. टा. वृत्तसेवा, वसई :

वसई-विरार शहरातील अरुंद रस्ते असलेले मार्ग एकदिशा मार्ग बनवावेत, ठिकठिकाणी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी, कोंडी होणाऱ्या ठिकाणी अवजड वाहनांस बंदी घालावी, अशा विविध उपाययोजना केल्यास वसई विरार शहरातील वाहतूककोंडी सुटण्यास मदत होईल, अशा प्रतिक्रिया वसई-विरार मधून व्यक्त होत आहेत.

वसई-विरारमधील वाहतूक-कोंडीच्या समस्येवर मार्ग काढण्यासाठी पालिकेतर्फे नुकतीच एक बैठक घेण्यात आली. यावेळी विविध उपाययोजना सुचविण्यात आल्या. याबाबत नागरिकांनी 'महाराष्ट्र टाइम्स'कडेही प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.

**तुम्हीही पाठवा सूचना**

**वसई-विरार परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तुमच्याकडेही काही सूचना असतील, त्या 'महाराष्ट्र टाइम्स' कडे जरूर पाठवा. ईमेल mtthaneplus@timesgroup.com**



“ विरार रेल्वे स्थानक परिसरात सर्वात मोठी वाहतूककोंडी होत असते. यामुळे तासन् तास ताटकळत बसावे लागते. रिक्षाचालकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने ही कोंडी होत असून येथे अवैध रिक्षाचालकांवर कारवाई होणे गरजेचे आहे. तसेच सायंकाळच्या वेळी एकत्र लांब पल्ल्याच्या पाच गाड्या येथे थांबा घेत असल्याने प्रवाशांची मोठी गर्दी स्थानक परिसरात होते. हे लक्षात घेता रेल्वे स्थानक परिसरात अवजड वाहनांना बंदी घालावी.

\- अजय परब, विरार



“ वसई-विरारमध्ये वाहतूककोंडीची समस्या बिकट झाली असून यामध्ये सर्वाधिक वाहतूककोंडी फेरीवाल्यांमुळे होते. त्यामुळे महानगरपालिकेने सर्वप्रथम फेरीवाला धोरण निश्चित करावे आणि या फेरीवाल्यांना जागा निश्चित करून द्याव्यात. यासह अरुंद रस्ते असलेल्या आणि शक्य असलेल्या ठिकाणी एकदिशा मार्ग बनवावेत.

\- भक्ती पाटील, नालासोपारा

CS CamScanner
Scanned with CamScanner

दि. 19/02/2023

5) लोकसत्ता पू. पान क्र. 4

# सायबर गुन्हेगारीचा वाढता धोका

विरारमध्ये दिवसेंदिवस सायबर गुन्हेगारीच्या तक्रारी वाढत असून, ही चिंतेची बाब बनली आहे.

मीरा-भाईंदर वसई विरार-पोलीस आयुक्तालयामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाले आहे. त्याचबरोबर घडलेले गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढले आहे, ही दिलासादायक बाब असली तरी मात्र, दुसरीकडे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण २०२१ च्या तुलनेत २०२२ मध्ये तिपटीने वाढले आहे. २०२१ मध्ये सायबर गुन्हे कक्षाकडे ७९४ तक्रारी, तर २०२२ मध्ये दोन हजार ७३८ एवढ्या तक्रारी आल्या होत्या. विशेष म्हणजे फसवणूक झालेल्यांमध्ये उच्चशिक्षित, उच्चपदस्थ, डॉक्टर, वकील, बँक तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचारी आहेत.

राष्ट्रीय गुन्हे सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार २०२० मध्ये भारतात ५० हजार ३५ सायबर गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यात उत्तर प्रदेश अग्रेसर आहे. त्यानंतर कर्नाटकचा दुसरा, तर महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. २०२० मध्ये महाराष्ट्रात पाच हजार ४९६ गुन्ह्यांची नोंद आहे. एकूण गुन्ह्यांपैकी १०.९८ टक्के गुन्हे हे सायबर गुन्हे आहेत.

## जागरूकता आहे का?



ऑनलाइन फसवणूक झाल्याची बाब उशिरा नागरिकांच्या लक्षात येते. अनेक प्रकरणात ठकसेन वारंवार विविध प्रलोभन दाखवून वारंवार पैसे भरायला लावतात. त्यामुळे नागरिकांनी सावध असणे गरजेचे आहे. ऑनलाइन कर्जाचे ॲप डाउनलोड करण्यापूर्वी त्याच्या सत्यतेची पडताळणी करावी, फोनवरून कोणताही अनोळखी व्यक्तीस क्रेडीट कार्ड आणि बँकेशी संबंधित माहिती देऊ नये. ओटीपी सांगू नये. क्रेडीट कार्डद्वारे व्यवहार करताना त्याची माहिती कुठेही सेव्ह करू नये. क्रेडीट कार्ड वापरकर्त्याने व्यवहाराचे प्रत्येक लघुसंदेश (एसएमएस) तपासावे. त्यामध्ये काही अनियमितता असल्यास तत्काळ संबंधित बँक व सायबर कक्षाकडे तक्रार करावी.

## सायबर कार्यालय दूर

ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाली की नागरिक स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार करतात. मात्र स्थानिक पोलीस तक्रारी घेत नाहीत किंवा सायबर कक्षाकडे जाण्याचा सल्ला देतात. पोलीस आयुक्तालयाचे सायबर कार्यालय लांब असल्याने सामान्य नागरिकांना त्याबाबत माहिती नसते. त्याबाबत ते अनभिज्ञ असतात. त्यामुळे २४ तासांचा कालावधी निघून जातो आणि मग हे फसवणूक केलेले पैसे परत मिळविण्यात अडचणी येतात.

समाज माध्यमावरील विविध व्यासपीठांवरून अश्लील छायाचित्रे प्रसारित करणे, बनावट खाते उघडून बदनामी करणे, खंडणी उकळणे आदी प्रकार होत आहेत. डिजिटल युग आणि स्मार्ट फोनचा वापर वाढल्यानंतर सायबर भामटे सक्रिय झाले आहेत. ज्या वेगाने या डिजिटल माध्यमांचा वापर वाढू लागला आहे, त्याच वेगाने सायबर भामट्यांमार्फत फसवणुकीचे प्रकार देखील वाढले आहेत.

सायबर भामटे मुख्यतः चार मार्गांनी नागरिकांचे पैसे खात्यातून लंपास करतात. त्यातील पहिला म्हणजे ई-कॉमर्स संकेतस्थळांवर पैसे वळवले जातात. डमी ऑर्डरने ते कंपनीकडे व्यवहार करतात आणि फसवणूक झालेल्या नागरिकांचे पैसे येताच ते काढून घेतात. यामुळे ते कधी पकडले जात नाहीत. दुसऱ्या प्रकारात 'पेमेंट गेटवे'च्या माध्यमातून पैसे वळवले जातात. तिसऱ्या प्रकारात मनोरंजन, खेळ (गेमिंग)च्या संकेतस्थळावरून पैसे वळविण्यात येतात. तर, चौथ्या प्रकारात थेट बँकेतून काढून युपीआयद्वारे दुसऱ्या बँक वळवले जातात. परंतु, तत्काळ संबंधित कंपनीशी संपर्क करून व्यवहार थांबवून ते पैसे नागरिकांना परत मिळवून देता येतात. मात्र, जेव्हा पैसे दुसऱ्या खात्यात जातात तेव्हा कायदेशीर प्रक्रिया करावी लागते. त्याला विलंब लागतो. त्यामुळे गुन्हा घडला की तत्काळ सायबर पोलिसांकडे तक्रार करणे आवश्यक आहे. त्या वेळेला 'गोल्डन अवर' असे म्हणतात.

त्यामुळे ऑनलाइन व्यवहार करताना काळजी घेणे गरजेचे असल्याचे आवाहन पोलिसांकडून नेहमीच करण्यात येते.

CS CamScanner

Scanned with CamScanner

दि. 10/02/2023

6) लोकमत पान क्र. 3

# फसवणूक करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## पेल्हार पोलिसांची कामगिरी; १६ गुन्ह्यांची उकल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बोलण्यात गुंतवून एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या चार आरोपींच्या आंतरराज्य टोळीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. या टोळीकडून १६ गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती गुरुवारी पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली.

संतोष भवन येथे राहणारे हरिलाल यादव (४४) हे १ डिसेंबरला आयसीआयसीआय बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. तेथे असलेल्या चार आरोपींनी गोंधळ घालून व बोलण्यात गुंतवून त्यांचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून दुसऱ्या बँकेचे एटीएम दिले. त्यांचे एटीएम कार्ड घेऊन आरोपींनी त्यांच्या खात्यातून ४० हजार रुपये काढून फसवणूक केली. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. आयुक्तालयाच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून एटीएम सेंटरमधून पैसे काढून देण्याच्या बहाण्याने हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणारी टोळी सक्रिय झाल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली होती.

पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांनी तांत्रिक माहितीवरून आरोपी निष्पन्न केले. परंतु, आरोपी वारंवार त्यांचे वास्तव्याचे ठिकाण बदलत होते. आरोपी कारने मध्य प्रदेशमार्गे महाराष्ट्रात येत असल्याबाबत गोपनीय माहिती पोलिस उपनिरीक्षक सनिल पाटील यांना मिळाली. त्यांनी ही माहिती शिरपूरचे पोलिस निरीक्षक शिरसाठ यांना देऊन त्यांच्या मदतीने आरोपी विकी पंडित साळवे (३२), विकी राजू वानखेडे (२२), अनिल कडोबा वेलदोडे (२९) आणि वैभव आत्माराम महाडिक (३४) यांना धुळ्यात पकडले. कोणाची अशा प्रकारे फसवणूक झाली असल्यास त्यांनी तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्यात तक्रार नोंद करावी, असे पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी सांगितले.



### ५ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

आरोपींकडे वेगवेगळ्या बँकांचे एकूण १४ एटीएम कार्ड, गुन्ह्यात मिळालेल्या रकमेतून खरेदी केलेली कार, रोख ८९ हजार व वेगवेगळ्या कंपनींचे ३९ हजार रुपये किमतीचे मोबाइल फोन असा एकूण ५ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

7) लोकमत पु. पान क्र. 3

# मीरा रोडच्या शांतीनगरमध्ये जमिनीच्या कब्जासाठी राडे

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा रोडच्या यूएलसी योजनेतील शांतीनगर वसाहतीमधील मोकळ्या जागा बळकावण्यावरून विकसक व स्वतःला जमीनमालक म्हणवणाऱ्यांत राडेबाजी सुरू आहे. त्यासाठी मोठ्या संख्येने महिला आणि पुरुष टोळ्यांचा वापर करून जागेवर ताबा मिळवण्यासाठी गुन्हेगारी पद्धतीचा अवलंब केला जात असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मीरा रोडची शांतीनगर वसाहत शासनाच्या यूएलसी योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांसाठी बांधण्यात आली आहे. सदर वसाहतीच्या आरजी जागेत बेकायदा बांधकामे व अतिक्रमणे झाली असतानादेखील महापालिका मात्र यूएलसी विभागाची नाहरकत न घेताच नवनवीन बांधकाम परवानग्या शांती स्टार बिल्डरला देत आहे. परंतु, रहिवाशांना मात्र अजूनही इमारत, आरजी व संकुलाच्या जमिनीची मालकी मिळाली नसून पुनर्विकाससुद्धा, रखडला आहे. या वसाहतीमधील मोकळे भूखंड आपल्या मालकीचे असल्यावरून शांती स्टार बिल्डर आणि राहुल बिल्डर, राकेश शाह यांच्यात राडेबाजी सुरु झाली आहे. मोकळ्या जागेत कुठे शांती स्टार बिल्डर तर कुठे राहुल बिल्डर, राकेश शाह यांचे फलक लागले आहेत. शांतीनगरमधील सेक्टर ३ मध्ये डी/३४ इमारतीच्या बाजूला सुमारे ७ गुंठे जमीन आहे. त्या ठिकाणी राहुल बिल्डर, राकेश शाह आदींच्या सांगण्यावरून ४० ते ५० पुरुष व १० ते १५ महिला यांच्या टोळीने शांती स्टार बिल्डरचे कुंपण व फलक तोडले. सुरक्षारक्षक व व्यवस्थापक उल्हास कामत यांना धमकी देत मारहाण केल्याची फिर्याद कामत यांनी दिली होती. त्यावरून नयानगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

### गुन्हा दाखल

आता राकेश शाह यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, शांती स्टार बिल्डरच्या सांगण्यावरुन बिल्डरच्या २० ते २२ महिला व ४ ते ५ पुरुष यांनी जेसीबीने कुंपण तोडून आपल्या जागेवर जाऊन कब्जा घेतला म्हणून नयानगर पोलिसांनी संबंधितांवर गुन्हा दाखल केला आहे. जमिनीच्या मालकीची कागदपत्रे आपल्याकडे आहेत. मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल असताना शांती स्टार बिल्डर बळजबरी जमिनीचा ताबा घेऊ पाहत असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. १०/०२/२०२३

४) लोकसत्ता पू. पान क्र. ४

# 'रिकॅलिब्रेशन'साठी ऐरोलीचा फेरा

## घोडबंदर येथील परिवहन कार्यालयात सुविधा देण्याची मागणी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** परिवहन विभागाने रिक्षाच्या भाडेदरात वाढ केल्यानंतर सर्व रिक्षाचालकांना इलेक्ट्रिक मीटरचे पुनर्प्रमाणीकरण (रिकॅलिब्रेशन) करण्याचे सक्त आदेश दिले आहेत. मात्र, मीरा-भाईंदरमधील रिक्षाचालकांना ही प्रक्रिया करण्यासाठी नवी मुंबई येथील ऐरोली येथे जावे लागत असल्याने त्यांनी याकडे पाठ फिरवली आहे. शासनाने मीरा-भाईंदरच्या रिक्षाचालकांसाठी शहरातील आरटीओ कार्यालयात ही सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी रिक्षा युनियनकडून केली जात आहे.

> मीरा-भाईंदर शहरातील रिक्षाचे परवाना नूतनीकरण घोडबंदर येथील आरटीओ कार्यालयात होत आहे. मात्र, मीटर पुनर्प्रमाणीकरण करण्यासाठी येथील रिक्षाचालकांना नवी मुंबई येथे जावे लागत आहे. त्यामुळे आम्ही परिवहन विभागाकडे ही सोय घोडबंदर येथेच करण्यात यावी, अशी मागणी करत आहोत.
> **- भारत कदम**, उपाध्यक्ष, वंचित बहुजन रिक्षा युनियन

> ज्या रिक्षाचालकांनी आपल्या मीटरचे पुनर्प्रमाणीकरण केलेले नाही, अशा रिक्षाचालकांवर वाहतूक विभागाकडून कारवाई केली जात आहे.
> **- मंगेश कड**, पोलीस उपनिरीक्षक, काशिमीरा वाहतूक शाखा

रिक्षा भाड्यात ऑक्टोबरमध्ये दरवाढ झाल्यानंतर नवीन दरपत्रकानुसार इलेक्ट्रिक मीटरचे रिकॅलिब्रेशन करण्याचे आवाहन परिवहन विभागाने रिक्षाचालकांना केले होते. मुंबई महानगर क्षेत्रात एमएमआरटीए प्राधिकरणाने रिक्षाचालकांना रिकॅलिब्रेशनसाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदत दिली होती. त्यानंतर पाच हजार रुपये दंड आकारणी करणार असल्याचे सूचित केले होते. परंतु, आता पुन्हा ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



मीरा-भाईंदरमध्ये १५ हजारांहून अधिक रिक्षा आहेत. त्यापैकी अधिकतर रिक्षाचालकांनी अजूनही मीटरचे रिकॅलिब्रेशन केले नसल्याचे दिसून येत आहे. हे प्रमाणीकरण करण्यासाठी रिक्षाचालकांना नवी मुंबई येथील ऐरोली भागात असलेल्या परिवहन कार्यलयात जावे लागत आहे. मात्र, ही सर्व प्रक्रिया रिक्षाचालकांसाठी त्रासदायक व गैरसोयीचे ठरत आहे. त्यामुळे मीरा रोड येथील घोडबंदर येथे असलेल्या परिवहन कार्यलयात रिकॅलिब्रेशनची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी रिक्षा युनियनकडून केली जात आहे.

CS CamScanner

Scanned with CamScanner

लोकमत

चालकाचा मृत्यू झाल्याच्या घटनांत दिवसेंदिवस वाढ

# मोबाइलवर बोलताय? अपघाताचा धोका, दंडही लई मोठा!

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : 'अति घाई मरणाकडे नेई' किंवा 'नजर हटी दुर्घटना घटी' असे कितीही लिहिले तरी रस्त्यावर होणारे अपघात थांबत नाहीत. वाहन चालविताना मोबाईलवर बोलताना अपघात होऊन चालकाचा मृत्यू झाल्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. जीवाची पर्वा न करता मोबाईलवर सतत लागून राहणे हे अनेकांच्या जीवावर बेतले आहे.

मोबाईलवर बोलत असताना वाहन चालवू नये असे वाहतूक नियम असताना अनेकजण मोबाईलवर बोलून इतरांचा तसेच आपलाही बळी देतात. यावर नियंत्रणासाठी सुधारित मोटार वाहन कायद्यानुसार गाडी चालविताना मोबाईलवर बोलल्यास पहिल्या वेळी पकडले तर एक हजार रुपये आणि दुसऱ्या वेळी पकडले तर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.



## मोबाइलवर बोलताना आढळाल तर जबर दंड

### लाइट मोटर व्हेईकल

मोबाइलवर बोलताना वाहन चालविल्यास दुचाकीस्वार आणि तीनचाकी चालकांना पहिल्यांदा एक हजार रुपये नंतर तोच दंड दहा हजार रुपये करण्यात येईल.

### इतर वाहने



वाहन चालवताना मोबाईलवर बोलताना आढळल्यास चारचाकी वाहनचालकाला पहिल्यांदा एक हजार रुपये नंतर तोच दंड दहा हजार रुपये करण्यात येईल.

## १० लाखांचा दंड वसूल



वाहतूक विभागाच्या वसई, विरार विभागाने मागील वर्षभरात वाहन चालवताना मोबाईलवर बोलणाऱ्या ६०४ चालकांवर कारवाई केली आहे. त्यांच्याकडून १० लाख ३१ हजारांचा दंड वसूल केला आहे.

"वाहन चालवताना मोबाईलवर नाही बोलले, तर कोट्यवधी रुपयांचे नुकसान होत नाही. जिवापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही. त्यामुळे वाहन चालवताना मोबाइलवर बोलू नये. जर मोबाइल करणारा सारखाच फोन करीत असेल किंवा अत्यंत महत्त्वाचे असेल तर वाहन थांबवून बोलणे आवश्यक आहे.

- सागर इंगोले, पोलिस निरीक्षक, वसई परिमंडळ-२, वाहतूक विभाग

## अपघाताची शक्यता वाढते

- मोटार वाहन कायद्याप्रमाणे वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे हा गंभीर गुन्हा आहे.
- वाहन चालवताना मोबाईलवर बोलणाऱ्या चालकांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.
- मोबाईलवर बोलत असताना वाहन चालवणारे चालक स्वतःच्या बरोबरच अन्य प्रवाशांचाही जीव धोक्यात घालत असतात.





Scanned with CamScanner

लोकमत

# फसवणूक करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## पेल्हार पोलिसांची कामगिरी; १६ गुन्ह्यांची उकल

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बोलण्यात गुंतवून एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या चार आरोपींच्या आंतरराज्य टोळीला पेल्हारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. या टोळीकडून १६ गुन्ह्यांची उकल करून लाखोंचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती गुरुवारी पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी दिली.

संतोष भवन येथे राहणारे हरिलाल यादव (४४) हे ९ डिसेंबरला आयसीआयसीआय बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. तेथे असलेल्या चार आरोपींनी गोंधळ घालून व बोलण्यात गुंतवून त्यांचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून दुसऱ्या बँकेचे एटीएम दिले. त्यांचे एटीएम कार्ड घेऊन आरोपींनी त्यांच्या खात्यातून ४० हजार रुपये काढून फसवणूक केली. पेल्हार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. आयुक्तालयाच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून एटीएम सेंटरमधून पैसे काढून देण्याच्या बहाण्याने हातचलाखीने एटीएम कार्डची अदलाबदली करून नागरिकांची फसवणूक करणारी टोळी सक्रिय झाल्याने पोलिसांची डोकेदुखी वाढली होती.

पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलिसांनी तांत्रिक माहितीवरून आरोपी निष्पन्न केले. परंतु, आरोपी वारंवार त्यांचे वास्तव्याचे ठिकाण बदलत होते. आरोपी कारने मध्य प्रदेशमार्गे महाराष्ट्रात येत असल्याबाबत गोपनीय माहिती पोलिस उपनिरीक्षक सनिल पाटील यांना मिळाली. त्यांनी ही माहिती शिरपूरचे पोलिस निरीक्षक शिरसाठ यांना देऊन त्यांच्या मदतीने आरोपी विकी पंडित साळवे (३२), विकी राजू वानखेडे (२२), अनिल कडोबा वेलदोडे (२१) आणि वैभव आत्माराम महाडिक (३४) यांना धुळ्यात पकडले. कोणाची अशा प्रकारे फसवणूक झाली असल्यास त्यांनी तत्काळ नजीकच्या पोलिस ठाण्यात तक्रार नोंद करावी, असे पोलिस उपायुक्त सुहास बावचे यांनी सांगितले.



### ५ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

आरोपींकडे वेगवेगळ्या बँकांचे एकूण १४ एटीएम कार्ड, गुन्ह्यात मिळालेल्या रकमेतून खरेदी केलेली कार, रोख ८९ हजार व वेगवेगळ्या कंपनींचे ३९ हजार रुपये किमतीचे मोबाइल फोन असा एकूण ५ लाख २८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.



Scanned with CamScanner